# पर्वतराजींमधील मनुष्य

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

एकेकाळी गेयो नावाचा एक माणूस होता. त्याने ठरवले की, झाले तेवढे बस्स झाले आणि त्याला समाजापासून सुटी घेण्याची गरज आहे. कामाच्या ठिकाणी असलेला विसंवाद, त्याच्या कुटुंबातील गैरसमज आणि त्याच्याशी सहमत असणारे लोक शोधण्यासाठी त्याला करावा लागणारा रोजचा आटापीटा, या सर्व गोष्टींमुळे तो थकला होता. आपली ही बिकट अवस्था जेव्हा त्याने त्याच्या एका मित्राला, जो त्याचा विश्वासू सल्लागारदेखील होता त्याला सांगितली, तेव्हा त्याच्या त्या मित्राने त्याला निसर्गाच्या सान्निध्यात फेरफटका मारण्याचा सल्ला दिला. पर्वतराजींमधील आणि वनांमधील निरवता, सरोवरे आणि नद्यांची प्रशांती — गेयोच्या मनःस्थितीसाठी हितकारक असेल. या सर्व गोष्टी त्याच्या मनावरील ओझे काही प्रमाणात दूर करतील.

गेयोला ही कल्पना आवडली. त्याने विचार केला, "होय, विचलित करणाऱ्या आणि चीड आणणाऱ्या सर्व तऱ्हेच्या गोष्टींपासून दूर, एकांतवासात मी माझा वेळ घालवणे अधिक चांगले असेल."

साऊथ अमेरिकेच्या अगदी टोकाशी असलेल्या पॅटागोनियाजवळील एका लहानशा शहरात गेयो राहात होता. निसर्गसौंदर्याची तेथे अजिबात कमतरता नव्हती आणि त्याचा शोध घेण्यासाठी त्याला कुठेही जाण्याची गरज नव्हती. तो लगेचच बाहेर पडला, सूर्यप्रकाशाने प्रकाशित टेकड्यांच्या व आकाशी रंगाच्या नागमोडी ओढ्यांच्या बाजूने तो जात राहिला. थोड्या-थोड्या पावलांच्या अंतरावर थांबून तो दूरवर असलेल्या पर्वतांचा, त्यांच्या शिखरांच्या भव्यतेचा प्रसन्नतेने आस्वाद घेत होता, त्या पर्वतांवरील खडकांच्या पृष्ठभागांवर हवामानाच्या परिणामामुळे तयार झालेल्या खाचा त्याला दिलासादायक संदेश देत होत्या. त्या ठिकाणी केवळ तो, म्हणजे गेयो आणि विस्तृत मोकळे मैदान होते. त्यापेक्षा अधिक चांगले जीवन असूच शकत नव्हते.

काही तासांच्या त्याच्या पर्वतारोहणाच्या दरम्यान, गेयोला विश्रांती घेण्यासाठी एक मऊ गवताच्छादित टेकाड सापडले. इथून दिसणारे दृश्य अगदी योग्य होते. त्याच्या डाव्या बाजूला जांभळ्या रंगाच्या

ल्युपिनच्या फुलांचा सडा पडला होता, पाठीमागे प्रचंड शिखरे होती आणि वर होता — अखंड निळ्या रंगाचा कॅनव्हास. एकही ढग दृष्टीस पडत नव्हता.

अर्थात, थोड्या वेळातच काहीतरी दिसले. गेयो गवतावर पहूडला होता आणि दुपारच्या सूर्याची ऊब त्याला त्याच्या चेहऱ्यावर जाणवत होती. तेवढ्यात एक कापसासारखा दिसणारा मोठा पुंजका डोक्यावरून स्थिरपणे पुढे सरकताना त्याने पाहिला. पुढच्याच क्षणी त्या पुंजक्याने सूर्याला झाकून टाकले.

“हे!” गेयो म्हणाला. “हे, ढगांनो — थांबवा ते. इथून दूर निघून जा!”

नंतर, पर्वतांच्या मागून कुठूनतरी त्याला एक आवाज ऐकू आला.

“जाजाजाजाजा-अअअअआऽऽऽ . . .” तो कोणाचा तरी आवाज वाटत होता — पर्वतांमध्ये कुठेतरी असलेला एखादा मनुष्य जो कुणावरतरी किंवा कशावर तरी ओरडत असल्याचा.

कुतुहलाने गेयोला वाटले आपणही त्याला हाक मारावी.

“कोण आहे तिथे?”

“कोण आहे तिथे? कोण आहे तिथे? तिथे, तिथे, तिथे, तिथे. . . .”

“नाही, खरोखरच, कोण आहेस तू?”

“ तू, तू, तू, तू, तू . . .”

“मी नव्हे, तू!” गेयो वैतागाने ओरडला. मुला, पर्वतराजींमधील हा मनुष्य निश्चितच मूर्ख असावा!

“मी, मी, मी . . . तू, तू, तू . . .” आवाजाने प्रत्युतर दिले.

“ठीक आहे, आता तर, तो माझी चेष्टा करतो आहे,” गेयोने विचार केला. “मी त्याला दाखवतोच.”

मग गेयो आपले खांदे मागे ओढून आपली छाती फुगवली आणि त्याच्या निश्चयी, निरर्थक नसणाऱ्या आवाजात तो ओरडला :

“थांबव ते!”

अरे, पण पर्वतराजींमधील मनुष्य तयारीतच होता : अगदी पुढच्याच क्षणी त्याच्याकडून प्रतिसाद आला :

“थांबव ते, ते, ते, ते . . .”

गेयोसाठी मात्र हे अतीच झाले. “आआआआआऽऽऽ!” तो ओरडला.

अंदाजाप्रमाणे उत्तर आले — “आआआआआऽऽऽ”— परंतु तोपयत्त गेयोने आवेशाने त्या मनुष्याचा अपमान करण्यास सुरुवात केली होती. त्या मनुष्याशी युक्तिवाद करण्यात तर काहीच अर्थ नव्हता, तर मग अपमान का करू नये?

“मूर्ख!” गेयो ओरडला. “उपद्रवी मनुष्य! मूर्ख मनुष्य!”

ते अपमानास्पद शब्द अर्थातच त्याच्याकडे परत प्रतिध्वनीत झाले, त्यांच्या ध्वनीत आणि कर्णकटुतेत शेकडोपटींनी वाढ होऊन. गेयोने क्रोधित होऊन आणि गोंधळून जात सभोवताली पाहिले; टेकड्या आणि पर्वत जे काही मिनिटांपूर्वी इतके आकर्षक वाटत होते, ते आता त्याला पराभूत करत आहेत असे वाटत होते, कठोर स्वर समोरील दुर्दम्य भागांकडून माघारी परत येत होते.

“हा मनुष्य माझ्याशी अशा प्रकारे बोलण्याचे धाडस कसा करू शकतो!” असे त्याला वाटले. “मी — गेयो! आणि हे पाहा त्याने काय केले! माझ्यासाठी सुंदर असलेले हे ठिकाण त्याने उद्‌ध्वस्त केले.”

पर्वतराजींकडे एक शेवटचा कडवट दृष्टिक्षेप टाकत गेयो परत फिरला आणि सरळ घरी चालता झाला. चालताना तो हलक्या आवाजात स्वतःशीच कुजबुजत होता, त्याचे विचार माश्यांच्या झुंडीप्रमाणे त्याच्या डोक्यात घोंघावत होते. त्याला त्याच्या हृदयाभोवती दाब पडल्यासारखे व हृदय पिळवटल्यासारखे वाटले, तिथे अचानक उद्‌भवलेल्या लाखो अदृश्य अवरोधांनी.

काही वेळाने तो त्याच्या घराकडे जाणाऱ्या धुळीने माखलेल्या रस्त्यावर पोहोचला. रस्त्यावर चालण्यास सुरुवात करताच त्याने त्याच्या मित्राला समोरून त्याच्याकडे येताना पाहिले.

“गेयो!” मित्र म्हणाला. “तू भटकंती करून परत आलास की नाही हे पाहण्यासाठी मी तुलाच भेटायला येत होतो. पण थांब — काही अनुचित घडले आहे का?” गेयोच्या चेहऱ्यावरील हावभाव मित्राने

पाहिले. तो नुकताच ज्या पर्वतरांगांमधून बाहेर पडला होता, त्यांच्यासारखाच त्याचा चेहरा भावनाशून्य दिसत होता.

“तुझा यावर विश्वासच बसणार नाही!” गेयो म्हणाला. काय घडले त्याचे विवरण त्याने केले, पर्वतराजींमध्ये तो कशा प्रकारे स्वतःतच मग्न, निसर्गाशी एकरूप होत होता आणि त्याचवेळी हा अपरिचित मनुष्य मध्येच कसा उपटला होता.

ओठावर येणारे आपले हसू दाबत गेयोच्या मित्राने ते बोलणे लक्षपूर्वक ऐकले. क्षणभर तो काहीच बोलला नाही. मग त्याने आपले हात गेयोच्या खांद्यांवर ठेवले.

“गेयो,” तो हळुवारपणे म्हणाला. “तू अजुन एक प्रयत्न का करत नाहीस? तू त्या पर्वतांकडे परत जा. तू स्वतःच म्हणाला होतास की, तुला तिथे असणे किती आवडले — म्हणजे, पर्वतांमधील त्या . . . ओऽह . . . मनुष्यासमवेत घडलेल्या त्या दुर्दैवी घटनेपूर्वी.”

अतिशय रागाने उत्तर देण्यासाठी गेयोने आधीच आपले तोंड उघडले होते. त्याच्या मित्राने केवळ स्मितहास्य केले आणि त्याने पुढे काही बोलण्याआधी त्याला थांबवले :

“गेयो आता फरक एवढाच आहे की यावेळी तू जेव्हा जाशील, तेव्हा माझी अशी इच्छा आहे की तू त्या गोष्टी उच्चाराव्यात ज्या सकारात्मक आहेत. तू अशा गोष्टी बोलाव्यात, ज्या तुला स्वतःला ऐकाव्याशा वाटतात, ज्या इतरांनी तुझ्यासाठी म्हणाव्यात असे तुला वाटते. मला वाटते की, तू जर असे केलेस, तर पर्वतराजींमधील मनुष्य तुला सतावणार नाही.”

गेयोने आपले तोंड एकदम बंद केले. त्याने भुवया उंचावल्या. या योजनेबद्दल त्याला तेवढीशी खात्री वाटत नव्हती. पण मग त्याने विचार केला, गमावण्यासारखे आहेच काय? तिथे त्याला सतावणारा पर्वराजींमधील तो मनुष्य असेल नाहीतर शहरामध्ये दुसरे कोणीतरी. निदान पर्वतराजींमध्ये तो अधिक नैसर्गिक सौंदर्याचा आस्वाद तरी घेऊ शकेल.

तेव्हा मोठ्या कष्टाने तो परत फिरला. निश्चितच, पहिल्यांदा गेला होता त्यापेक्षा कमी उत्साहाने. अखेरीस त्याला तेच गवताच्छादित टेकाड गवसले, ज्यावर त्याने पूर्वी विश्रांती घेतली होती. डावीकडे ल्युपिनची फुले होती आणि वरती ते विस्तीर्ण निरभ्र आकाश. तो खाली बसला, क्षणभर

स्थिरावण्यासाठी. आपला श्वास आपल्या शरीरातून संचार करतो आहे असे त्याला जाणवले. सभोवतालच्या रंग आणि संरचना यांच्या त्या आश्चर्यकारक विस्तीर्ण देखाव्यावर त्याने नजर टाकली.

त्याच्या छातीतील ते काहीतरी — तो दबाव तिथे आहे याची त्याला जाणीव झाली नव्हती — तो निवळू लागला होता. पर्वतांकडे पाहत तो हळूच म्हणाला, “सुंदर.”

आणि मग गेयोला त्याच्या मित्राने दिलेला सल्ला आठवला.

“सुंदर,” तो पुन्हा म्हणाला, यावेळी जास्त मोठ्याने, जेणेकरून पर्वत आणि टेकड्या ऐकू शकतील.

“सुंदर,” पुन्हा स्वर्गीय आवाजात गायले गेले. “सुंदर, सुंदर, सुंदर, सुंदर . . .”

गेयोच्या चेहऱ्यावर हास्य उमटले. किती मंजुळ स्वर होते हे! इतर सर्व अद्भूत विचार जे त्याला मोठ्याने ऐकावेसे वाटत होते, ते सर्व प्रेमळ शब्द जे इतरांनी त्याच्यासाठी व्यक्त करावेत असे त्याला वाटत होते, त्या सर्वांबद्दल त्याने विचार करण्यास सुरुवात केली. एका पाठोपाठ एक असे करत ते त्याने मोठ्याने ओरडून सांगितले, त्याचा आवाज अधिक खरेपणाने, अधिक अत्यानंदाने वाढत जात होता. प्रत्येक वेळी पर्वतराजींमधील मनुष्य त्याच्याशी परत त्याच स्वरांमध्ये गाऊन प्रतिसाद देत होता. किंवा — ते पर्वतच होते का की, जे स्वतःच गात होते? ते वरील आकाश होते का, की खालची पृथ्वी होती, जे ते गात होते?

जसजसे त्या ध्वनीने गेयोला घेरले, जसजसा तो ध्वनी त्याच्या अस्तित्वातून भ्रमण करू लागला, तसतसे त्याचे विचार सल्लागार असलेल्या त्याच्या मित्राकडे वळले. तो मित्र ज्याने पर्वतांना पुन्हा भेट देण्याचा सल्ला त्याला दिला होता. गेयोमध्ये त्याच्या या सूज्ञ आणि खंबीर मित्राप्रति आत्मीयतेचा भाव भरून आला आणि कृतज्ञतेचा भाव त्याच्या ओठांवर अवतरला. खरे पाहता, त्याच्या जीवनात आलेल्या सर्वच लोकांचा तो एका नाविन्यपूर्ण दृष्टीने विचार करू लागला. त्यांच्याबद्दल असलेल्या सदिच्छा, स्तुत्य वाटणारे त्यांच्यातील गुण, त्यांच्या सहवासात त्याला वाटत असलेल्या चांगल्या भावना त्याने मोठ्याने बोलून अभिव्यक्त केल्या.

सकारात्मकता विपुल झाली — ती दुमदुमली — पर्वतराजींमधून, तिच्या असंख्य नादाचे तरंग एकमेकांत मिसळत राहिले, एक प्रकारच्या स्वर्गीय मंजूळ आवाजाच्या किणकिणत्या घंटेसारखे. या नाद

स्पंदनाची शक्ती इतकी प्रभावी आणि स्पष्टगोचर होती की, गेयोला वाटले पुढे जावे आणि तिला स्पर्श करावा.

तेव्हा तो तिथेच स्तब्ध उभा राहिला, पर्वतराजींमधील हा मनुष्य, त्याचे हात त्याच्या समोरील पॅटागोनियाच्या महान विस्तीर्ण प्रदेशाकडे पसरले होते. तो तिथेच स्तब्ध उभा राहिला, त्याचे मन संगीतात निमग्न झाले होते. तो तिथेच स्तब्ध उभा राहिला, त्याचे मन मौनात लीन झाले होते.

© एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.